


दैनिक निडर निर्भिड
# जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com RNI NO-MAHMAR/2022/90217

वर्ष ३ रे अंक : ३३३ वा गुरूवार दि ०२ एप्रिल २०२६ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये

# साकळाई योजनेला १,२३४ कोटी, दिव्यांगांच्या शिष्यवृत्तीत मोठी वाढ; मंत्रिमंडळ बैठकीत सहा महत्त्वाचे निर्णय

**वृत्तसंस्था/मुंबई**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत राज्यातील पाणी, पर्यावरण, शिक्षण आणि प्रशासनाशी संबंधित महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. अहिल्यानगरमधील साकळाई सिंचन योजनेसाठी १२३४ कोटींची मंजुरी, ५४ प्रदूषित नद्यांच्या पुनरुज्जीवनासाठी स्वतंत्र प्राधिकरण, तसेच दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीत वाढ असे महत्त्वाचे निर्णय या बैठकीत घेण्यात आले. याशिवाय आरक्षण उपवर्गीकरणावर समिती, अमरावतीत क्रीडा संकुलासाठी जमीन आणि भूमि अभिलेख विभागातील प्रशासकीय बदलांनाही मंजुरी देण्यात आली. अहिल्यानगर जिल्ह्यातील श्रीगोंदा आणि नगर तालुक्यातील ३२ गावांसाठी वरदान ठरणाऱ्या साकळाई उपसा सिंचन योजनेसाठी १,२३४ कोटी १३ लाख रुपयांच्या तरतुदीला मंजुरी मिळाली. घोड धरणातून १.८० टीएमसी पाणी उचलून ९,६०० हेक्टर क्षेत्र ओलिताखाली येणार आहे. राज्यातील ५४ प्रदूषित नदी पट्ट्यांचे पुनरुज्जीवन करण्यासाठी स्वतंत्र प्राधिकरणाची स्थापना करण्यात आली आहे. याचे अध्यक्ष मुख्यमंत्री असतील. मिठी, मुळा-मुठा, भीमा आणि पंचगंगा यांसारख्या नद्यांचे प्रदूषण रोखण्यासाठी २,००० कोटींचा निधी उभारण्यासही मान्यता देण्यात आली आहे. शिशुवर्ग ते बारावीपर्यंतच्या दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीत भरीव वाढ करण्यात आली आहे. आता शिशुवर्ग ते ८ वीच्या विद्यार्थ्यांना दरमहा ५०० रुपये, तर ११ वी-१२ वीच्या निवासी विद्यार्थ्यांना १,००० रुपये शिष्यवृत्ती मिळेल. यापूर्वी ही रक्कम केवळ १०० ते २०० रुपयांच्या दरम्यान होती. अनुसूचित जातींच्या आरक्षणातील उपवर्गीकरणाबाबत प्राप्त निवेदने आणि अर्जांचा विचार करण्यासाठी मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे. ही समिती एका महिन्यात आपला अहवाल मंत्रिमंडळाला सादर करेल. भूमि अभिलेख विभागातील भूकरमापक हे पद रद्द करून आता परिरक्षण भूमापक हे नवीन पद निर्माण करण्यात आले आहे. या विभागाच्या सुधारित आकृतीबंधानुसार एकूण १०,६८३ पदांना मंजुरी देण्यात आली असून,






कर्मचाऱ्यांच्या वेतनश्रेणीतही सुधारणा होणार आहे. अमरावती येथील मौजे नवसारी येथील १६,७०८ चौ.मी. जमीन अमरावती महानगरपालिकेला क्रीडा संकुलासाठी देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच या जमिनीवरील जुने वाणिज्य वापर शुल्कही माफ करण्यात आले असून, यामुळे शहरात क्रीडा सुविधांचा विकास होणार आहे.

# बारामती पोटनिवडणुकीत पहिल्याच दिवशी बाहेरच्याउमेदवारांची एण्ट्री; तीन जणांकडून उमेदवारी अर्ज दाखल

**वृत्तसंस्था/बारामती**

बारामती विधानसभा पोटनिवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पहिल्याच दिवशी अनपेक्षित घडामोड घडली असून, स्थानिक पातळीवरून एकही अर्ज न येता थेट बाहेरील इच्छुक उमेदवारांनी उमेदवारी अर्ज दाखल केल्याने राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे. या घडामोडींमुळे बारामतीच्या पारंपरिक राजकारणाला नव्या समीकरणांचा धक्का बसण्याची चिन्हे दिसत आहेत. निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या कार्यक्रमानुसार, बारामती व राहुरी या दोन विधानसभा मतदारसंघांसाठी २३ एप्रिल २०२६ रोजी मतदान होणार असून, ४ मे रोजी मतमोजणी पार पडणार आहे. राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री व बारामतीचे आमदार अजित पवार तसेच राहुरीचे आमदार शिवाजी भानुदास कर्डिले यांच्या निधनामुळे या जागा रिक्त झाल्या आहेत. दरम्यान, बारामती पोटनिवडणुकीसाठी अर्ज दाखल करण्याच्या पहिल्याच दिवशी तीन उमेदवारांनी अर्ज दाखल केले. विशेष म्हणजे,



या तिघांपैकी एकही उमेदवार बारामती मतदारसंघातील नसल्याचे स्पष्ट झाले आहे. जत तालुक्यातील सतीश कृष्णा कदम यांनी हिंदुस्तान जनता पार्टीकडून, सातारा येथील सागर शरद भिसे यांनी अपक्ष म्हणून, तर सोलापूर जिल्ह्यातील सांगोला येथील राघू घुटुकडे यांनी न्यू राष्ट्रीय समाज पार्टीच्या वतीने उमेदवारी अर्ज दाखल केला आहे.

या अनपेक्षित घडामोडींमुळे बारामतीतील स्थानिक राजकीय इच्छुकांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले असून, प्रमुख पक्षांचे अधिकृत उमेदवार कोण असणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. दुसरीकडे, काँग्रेस पक्षाने बारामती पोटनिवडणूक लढवण्याची स्पष्ट तयारी दर्शवली असून, जिल्हा काँग्रेस कमिटीच्या बैठकीत या निर्णयाला एकमुखी पाठिंबा देण्यात आला आहे. त्यामुळे बारामतीत काँग्रेसकडून दमदार लढत पाहायला मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे. याच पार्श्वभूमीवर, ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांच्याही उमेदवारीबाबत चर्चा रंगू लागली असून, तेही अर्ज दाखल करण्याची शक्यता वर्तवली जात आहे. त्यामुळे निवडणूक रंगतदार होण्याची चिन्हे दिसत आहेत. दरम्यान, अजित पवार यांच्या निधनानंतर होत असलेल्या या पोटनिवडणुकीत राष्ट्रवादीकडून राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार या निवडणूक रिंगणात असणार हे निश्चित आहे. त्यांच्याविरोधात उमेदवारी अर्ज माघारी घेण्याच्या दिवसापर्यंत कोणा-कोणाचा अर्ज कायम राहतो, हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.

# संस्कृतीचा तिसरा पाखा

अन्नग्रहण हे तर पृथ्वीतलावरील प्रत्येक जीवजंतू कुठल्या ना कुठल्या स्वरूपात करतोच. त्यामुळे संस्कृती तील ङ्गअन्नफ हा घटक माणसासाठी सगळ्यात पहिला आणि महत्त्वाचा असेल हे तर गृहीतच आहे, पण मग माणूस वस्त्र आधी परिधान करू लागला की निवारा आधी शोधला असेल त्याने ? की या दोन्ही गोष्टी मानवी संस्कृतीच्या घडामोडीत एकत्रितच घडल्या होत्या? कोण जाणे; किंवा मानववंशशास्त्र व लोकसंस्कृतीच्या अभ्यासकांना माहीत, असे म्हणावे ! संस्कृती जन्मनिहाय आहे पण तरीही विविध समाजांतील संस्कृतीतील सभ्यतेचे घटक मात्र सारखेच असतात. मार्गारिट मीड या अमेरिकेतल्या एक नामवंत मानववंशशास्त्रज्ञ. विसाव्या शतकातील एक वादळी आणि वादग्रस्त व्यक्तिमत्त्व. त्यांच्या मते प्रत्येक समाजात सौजन्य, नम्रता, चांगले शिष्टाचार ही मूल्ये सार्वत्रिक आहेत. सर्वच मानवसमूहात ही मूल्ये आढळतात. मात्र यांची निश्चित मानके काय () याविषयी समूहांमध्ये मतभिन्नता आहे. अनेकदा ही मानके एकमेकांच्या अगदी विरुद्ध असतात. या मीड बाईंना एका विद्यार्थ्याने विचारले होते की संस्कृतीतील सभ्यतेचे पहिले लक्षण काय आहे ? (      ). विद्यार्थ्याची अपेक्षा होती की त्या मातीची भांडी, शिकारीची साधने, दळणे-दगड किंवा वस्त्राचे प्रकार, धार्मिक समजुती, निवाऱ्याची ठिकाणे असे काही सांगतील, पण त्या म्हणाल्या की सभ्यतेचा (  ) चा पहिला पुरावा म्हणजे १५ हजार वर्षे जुना ङ्ग फ्रॅक्चर्ड फेमर म ! फेमर हे माणसाच्या शरीरातील सर्वात लांब हाड आहे, जे पार्श्वभाग गुडघ्याला जोडते. जेव्हा समाजात वैद्यकशास्त्रच नव्हते तिथे फ्रॅक्चर झालेले फ `मर बरे व्हायला किमान सहा आठवडे लागत होते. त्या सांगाड्यात हे विशिष्ट हाड मोडून बरे झालेले सापडले. याचा अर्थ या दरम्यान त्या व्यक्तीची कुणीतरी काळजी घेतली आहे, त्याला खाऊ-पिऊ घालून जगवले आहे, त्याच्यासाठी शिकार केली आहे. म्हणजेच त्या माणसाला दुसऱ्या कुणीतरी पोसले होते, त्याची देखभाल केली होती




आणि म्हणूनच संस्कृतीच्या सभ्यतेचा पुरावा म्हणजे फ्रॅक्चर्ड फेमर ! यावरून आठवले, भोपाळनजीक भीमबेटका हे आदिमानवाच्या गुहांचे संकुल आहे. जशी रत्नागिरी, सिंधूदुर्गमध्ये कातळशिल्पे आहेत तशीच इथे गुहांच्या भिंतींवर रंगवलेली शैलचित्रे आहेत. कातळांवर शिल्प कोरण्याचा काळ दहा-वीस हजार वर्ष पुराणा असेल तर त्यामानाने गुहांमध्ये चित्र काढणे हे आधुनिक, नजीकचे म्हणावे लागेल; म्हणजे सुमारे पाच-सहा हजार वर्षांपूर्वीचे. भीमबेटकाच्या गुहांच्या भिंतींवर मातकट लाल-पांढरी, क्वचित पिवळ्या रंगाची अशी खूप चित्रे आहेत. या गुहांमध्येही एक निजलेला रुग्ण व त्यावर इलाज करणारा माणूस




The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

# आणखी दोन ते तीन आठवडे युद्ध; ट्रम्प यांच्या वक्तव्याने संभ्रम कायम

**वॉशिंग्टन/वृत्तसंस्था :** इराणविरोधातील युद्ध केव्हा संपणार, या बाबतचा संभ्रम कायम असून, अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी आता दोन ते तीन आठवड्यांत आम्ही इराणमधून बाहेर पडू, असे वक्तव्य केले आहे. त्यामुळे आणखी दोन ते तीन आठवडे युद्ध सुरू राहण्याची शक्यता आहे. अमेरिकेच्या मदतीला मित्रदेश न आल्याची खंत ट्रम्प यांनी पुन्हा बोलून दाखविली. दरम्यान, बुधवारी रात्री (भारतीय वेळेनुसार गुरुवारी सकाळी) युद्धासंदर्भात ट्रम्प अमेरिकेला संबोधणार आहेत.



### ट्रम्प यांच्या विधानांमुळे संभ्रम कायम

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या सातत्याने वेगवेगळ्या प्रतिक्रियांमुळे इराणविरोधातील युद्धाबाबत संभ्रम कायम आहे. अमेरिकेचे काही हजार सैनिक पश्चिम आशियात तैनात आहेत आणि आणखी काही सैनिक या ठिकाणी जात आहेत. इराणने होर्मुझची सामुद्रधुनी खुली केली नाही, तर ६ एप्रिलनंतर इराणमधील ऊर्जाक्षेत्रांना लक्ष्य करण्याची धमकी त्यांनी दिली होती. तसेच, इराणच्या खर्ग बेटावरही हल्ला करण्याची धमकी दिली होती. इराणशी बोलणी सुरू असल्याचे दावेही त्यांनी केले. मात्र, होर्मुझची सामुद्रधुनी खुली करण्याबाबत त्यांनी यापूर्वी केलेल्या वक्तव्यापासून यू-टर्न घेतल्याचे स्पष्ट झाले आहे.

त्यापूर्वी, व्हाइट हाउस येथे पत्रकारांशी बोलताना ट्रम्प यांनी आपली भूमिका स्पष्ट केली. युद्ध संपण्यासाठी राजनैतिक पातळीवरील चर्चा यशस्वी ठरण्याची अट असेल का, असे विचारले असता ट्रम्प यांनी इराणला कुठलाही करार करावा लागणार नाही, असे उत्तर दिले. 'माझ्याबरोबर त्यांना करार करावा लागणार नाही,' असे ते म्हणाले. इराणचे परराष्ट्रमंत्री अब्बास अराघची यांनी अमेरिकेचे पश्चिम आशियासाठीचे प्रतिनिधी स्टीव्ह विटकॉफ यांचा फोन आल्याची माहिती दिली. मात्र, अमेरिकेबरोबर कुठल्याही प्रकारच्या थेट वाटाघाटी सुरू नसल्याचे ते म्हणाले. 'अमेरिकेबरोबर चर्चा करून काही निष्पन्न होईल, यावर इराणचा विश्वास राहिलेला नाही. अमेरिकेवरची विश्वासार्हता शून्य झाली आहे.'

इराणचे परराष्ट्रमंत्री अब्बास अराघची यांनी अमेरिकेचे पश्चिम आशियासाठीचे प्रतिनिधी स्टीव्ह विटकॉफ यांचा फोन आल्याची माहिती दिली. मात्र, अमेरिकेबरोबर कुठल्याही प्रकारच्या थेट वाटाघाटी सुरू नसल्याचे ते म्हणाले. 'अमेरिकेबरोबर चर्चा करून काही निष्पन्न होईल, यावर इराणचा विश्वास राहिलेला नाही. अमेरिकेवरची विश्वासार्हता शून्य झाली आहे.' होर्मुझ सामुद्रधुनी खुली करण्यासाठी राजनैतिक पातळीवर परिषदेचे ब्रिटनमध्ये आयोजन केल्याची माहिती पंतप्रधान कीर स्टार्मर यांनी दिली. या सामुद्रधुनीतून जाणारा मार्ग सुरक्षित राखण्यासाठीची कटिबद्धता ३५ देशांनी दर्शविली आहे.

इस्रायलने जमिनीवरून आक्रमण सुरू ठेवल्याने सीमेवरील काही शहरांतून लेबनॉनची सुरक्षा दले हटविण्यात आल्याची माहिती लेबनॉनच्या लष्कराने दिली आहे. इस्रायलने दक्षिण लेबनॉनमधील लितानी नदीपर्यंतचा भाग सुरक्षा क्षेत्र म्हणून जाहीर केला आहे. या ठिकाणी हेजबोलाबरोबर इस्रायलची लढाई सुरू आहे. येथील सुमारे १० लाख नागरिकांचे गेल्या महिनाभरात विस्थापन झाले आहे.

संयुक्त अरब आमिरातीने इराणच्या नागरिकांना देशात प्रवेश करण्यास अथवा प्रवासादरम्यान देशातून दुसरीकडे जाण्यास मनाई केली आहे. 'यूएई'च्या तीन मोठ्या विमान कंपन्यांनी ही माहिती दिली. 'एमिरेट्स', 'एतिहाद' आणि 'फ्लाय दुबई' या विमान कंपन्यांनी ही घोषणा केली.

## ७ नगरसेवकांवर निलंबनाची कुऱ्हाड

**मुंबई :** काँग्रेस पक्षाने पक्षादेश धाब्यावर बसवून भाजपला साथ देणाऱ्या जालना महापालिकेतील 7 नगरसेवकांवर निलंबनाची कठोर कारवाई केली आहे. निर्णयामुळे स्थानिक राजकारणात मोठी खळबळ उडाली असून काँग्रेस पक्षाची अंतर्गत शिस्तीबाबत पुन्हा एकदा ठाम भूमिका स्पष्ट झाली आहे. यापूर्वी अंबरनाथ येथेही अशाच प्रकारे पक्षविरोधी भूमिका घेणाऱ्या नगरसेवकांवर कारवाई करण्यात आली होती. नुकत्याच पार पडलेल्या महापालिका निवडणुकांमध्ये काँग्रेसला काही ठिकाणी चांगले यश मिळाले होते. मात्र, निवडणुकीनंतर काही ठिकाणी पक्षातील अंतर्गत मतभेद व गटबाजी उफाळून आली. जालना महापालिकेत स्वीकृत सदस्यांच्या नियुक्ती प्रक्रियेवेळी हा वाद अधिक ठळकपणे समोर आला. काँग्रेसच्या 7 नगरसेवकांनी पक्षाच्या अधिकृत भूमिकेला हरताळ फासत भाजपच्या उमेदवारांना उघडपणे पाठिंबा दिला. काँग्रेसने या घटनेची गांभीर्याने दखल घेत तत्काळ चौकशी समिती नेमली होती. अहवालात संबंधित नगरसेवकांनी पक्षादेशाचे उल्लंघन केल्याचे स्पष्ट झाले. त्यांनी उघडपणे भाजपला सहकार्य केल्याचे निष्पन्न झाल्यानंतर पक्षाने कठोर भूमिका घेतली. त्यानुसार प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या निर्देशानुसार फारूक सादीक तुंडीवाले, इमरान खान अमानुल्ला खान, फरहाना अ. रऊफ अन्सारी, सुनील अशोक बोरडे, मयुरी दिनेश देवे, रुबीना माजीद पठाण व अनिल अशोक तिरुखे या 7 नगरसेवकांना निलंबित करण्यात आले.

## आम्ही स्वतंत्र लढणार ; पवार गटाची स्पष्ट भूमिका.. विलीनीकरणाचा विषय आमच्याकडून संपलाय

**पुणे/वृत्तसंस्था :** राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे विलीनीकरण होणार अशा चर्चा वारंवार केल्या जात आहेत. तसेच अजित पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी 16 फेब्रुवारी रोजी एका मुलाखत देताना म्हटले होते की विलीनीकरणाबद्दल माहीत नव्हते. आता 31 मार्च रोजी मुलाखत देताना म्हटले की, विलीनीकरणाच्या चर्चेबद्दल माहीत होते. तसे झाले तर स्वागतच आहे, असे विधान केले. यावरून शरद पवार गटाचे प्रवक्ते विकास लवांडे यांनी टीका केली आहे. तसेच शरद पवार गटाची अधिकृत भूमिका मांडली आहे.


विकास लवांडे म्हणाले, मी पक्षाचा अधिकृत प्रदेश प्रवक्ता या नात्याने स्पष्ट करू इच्छितो की आमच्या सर्व प्रमुख नेत्यांनी यापूर्वी विलीनीकरणाच्या संदर्भात ज्यावेळी अजितदादांचे दुर्दैवी निधन झाले त्यानंतर हा विषय आमच्या पातळीवरून पूर्णपणे संपलेला आहे. भविष्यात आमचा पक्ष स्वतंत्रपणे मजबूतपणे संघटन बांधणी करून पुढच्या निवडणुकांना स्वतंत्रपणे सामोरे जाणार आहे. त्यामुळे मी आमच्या पक्षाच्या सर्व कार्यकर्त्यांना पदाधिकाऱ्यांना सांगू इच्छितो की कुठल्याही अफवांवर किंवा कुठल्याही बातमीवर विश्वास ठेवू नका. तसेच यावर आपल्या पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे तसेच खासदार सुप्रिया सुळे यांनी याचे सुतोवाच वारंवार केले आहे. त्यामुळे विलीनीकरणाच्या बातम्या कोणीही जर स्वार्थी राजकारणाच्या हेतूने पेरत असेल तर ते चुकीचे आहे.

पुढे बोलताना विकास लवांडे म्हणाले, एका बाजूला म्हणायचे की मी अजितदादांचा मित्र आहे, तर दुसरीकडे अजितदादांच्या निधनानंतर अजित पवारांनी घेतलेले सर्व निर्णय स्थगित करण्याचे काम केले. अजितदादांनी विलीनीकरणाचे प्रयत्न सुरू केले होते, ते स्थगित केले. त्यामुळे मला एकच त्यांना सांगायचे आहे की, यापुढे जर अजितदादांना अशा प्रकारे खोटं ठरवत असाल तर दादांचा मी मित्र होतो असे कधीही म्हणू नका.

## एलपीजीचा सुरळीत पुरवठा व्हावा यासाठी प्रयत्नशील

**मुंबई/वृत्तसंस्था :** महाराष्ट्रात कार्यरत असलेली प्रत्येक विदेशी कंपनी ही राज्याचीच आहे, या भूमिकेतून राज्य शासन सर्वतोपरी काळजी घेत आहे. पश्चिम आशियातील युद्धामुळे एलपीजी गॅसच्या जागतिक तुटवड्याच्या पार्श्वभूमीवर राज्यातील स्वदेशी उद्योगाबरोबर विदेशी गुंतवणुकीच्या उद्योगांना तसेच नागरिकांना गॅसचा पुरवठा सुरळीत व्हावा, यासाठी राज्य शासनामार्फत आवश्यक ते सर्व प्रयत्न करण्यात येत असल्याचे सांगून या संकटात कोणत्याही उद्योगाला राज्य शासन अडचण येऊ देणार नाही, अशी ठाम भूमिका राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल यांनी व्यक्त केली.

सध्यस्थितीत पुण्यात सुरू असलेल्या विदेशी गुंतवणुकीच्या उद्योगांना एलपीजी पुरवठा सुरळीत व्हावा यासाठी स्वीडन, जपान आणि दक्षिण कोरियाचे महावाणिज्य दूत यांच्या विनंतीवरून सह्याद्री अतिथीगृह येथे मंत्री श्री रावल यांच्या प्रमुख उपस्थितीत बैठक झाली. या बैठकीत स्वीडनचे महावाणिज्य दूत आणि डीन ऑफ द कॉन्सुलर कॉर्प्स स्वेन ऑस्टबर्ग, जपानचे महावाणिज्य दूत कोजी यागी आणि दक्षिण कोरियाचे महावाणिज्य दूत डोंगवान यू, राजशिष्टाचार विभागाचे सचिव डॉ.राजेश गवांदे, अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या वतीने शिधावाटप नियंत्रक चंद्रकांत डांगे, राज्यातील तेल कंपन्यांचे समन्वयक उमेश कुलकर्णी आदी यावेळी उपस्थित होते.



राज्यातील एलपीजीच्या पुरवठ्याबाबत या बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली. राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल म्हणाले, जागतिक पुरवठा साखळी विस्कळीत झाल्याने आणि शिपिंग कंपन्यांकडून दरवाढ झाल्याने अडचणी निर्माण झाल्या असल्या तरी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी या परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून आहेत. त्यांच्या निर्देशानुसार राज्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली परिस्थिती हाताळण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जात आहेत. केंद्र सरकारच्या मार्गदर्शक सूचनांनुसार एलपीजी पुरवठ्याचे टप्प्याटप्प्याने वितरण सुरू असून प्राधान्य क्षेत्रांना दिलासा देण्यात येत आहे.

एलपीजीच्या काळाबाजारावर नियंत्रण ठेवण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात नियंत्रण कक्ष आणि हेल्पलाईन क्रमांक सुरू करण्यात आले आहेत. हे क्रमांक सर्व नागरिक आणि उद्योजकांपर्यंत पोहोचविण्याची सूचना करून मंत्री जयकुमार रावल यांनी नागरिक आणि उद्योगांकडून येणाऱ्या तक्रारींवर तत्काळ कारवाई करण्याचे तसेच दरवाढ किंवा कृत्रिम टंचाई निर्माण करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याचे आदेश दिले. सध्यस्थितीत कोणत्याही विदेशी उद्योगांना एलपीजीचा पुरवठा झाला नसल्याबाबत तक्रार नाही. त्यामुळे उद्योजकांनी काळजी न करता सहकार्य करावे, असे आवाहन सचिव डॉ.गवांदे यांनी यावेळी केले.

## युरिया व डीएपी खतांचा आरक्षित साठा एप्रिल व मे महिन्यात तयार ठेवावा

**मुंबई/वृत्तसंस्था :** खरीप हंगाम २०२६ करिता युरिया व डीएपी खतांचा आरक्षित साठा एप्रिल व मे महिन्यात तयार ठेवण्याचे काटेकोर नियोजन कृषी विभागाने करावे. शेतकऱ्यांना कोणत्याही परिस्थितीत खतांची कमतरता भासणार नाही याची दक्षता घ्यावी. कोणत्याही कंपनीने किंवा विक्रेत्याने खतांसोबत इतर उत्पादने घेण्याची सक्ती शेतकऱ्यांना करू नये असे निर्देश कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिले.

खरीप हंगाम २०२६ च्या पार्श्वभूमीवर राज्यातील खतांची उपलब्धता आणि नियोजनाचा आढावा घेण्यासाठी कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात बैठक झाली.यावेळी कृषि विभागाचे सचिव परिमल सिंह, संचालक कृषी सुनिल सी. बोरकर यासह विविध खत कंपन्यांचे अधिकारी उपस्थित होते.

कृषी मंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले की, खत उत्पादक व पुरवठादार कंपन्यांनी खते उपलब्ध होण्यापूर्वी कृषी विकास अधिकारी यांच्याकडून तालुकानिहाय पुरवठ्याचे नियोजन प्राप्त करून घ्यावे व त्यानुसार विक्रेत्यांना वाटप करावे.खत पुरवठा कंपन्यांनी घाऊक विक्रेत्यांकडे खताचा साठा शिल्लक राहणार नाही याची दक्षता घेऊन थेट अथवा घाऊक विक्रेत्यामार्फत किरकोळ खत विक्रेत्यांना खत पुरवठा करण्यास प्राधान्य द्यावे.घाऊक विक्रेत्यांना ज्या जिल्ह्यासाठी खत आवंटन दिले आहे त्यांना त्या जिल्ह्याबाहेर



युरिया व डीएपी खताची विक्री करता येणार नाही.ज्या विक्रेत्यांकडे खत नियंत्रण समिती प्रणालीवर २० मे, टन किंवा जास्त खत साठा शिल्लक आहे अशा खत विक्रेत्यांना नवीन खत पुरवठाकरून नये.खतांची विक्री पॉस मशीनवर रियल टाईमवर करावी.

कृषी मंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले की, युध्दजन्य परिस्थितीत खतांच्या पुरवठ्यावर परिणाम होवू नये यासाठी कृषि विभागाकडून काळजी घेण्यात येत आहे. नॅनो खतांचा वापर वाढवणे.

शेतकऱ्यांना हिरवळीच्या खतांचा वापर करण्यास प्रोत्साहित केले जाईल, ज्यामुळे जमिनीतील सूक्ष्मजीवांची क्रियाशीलता वाढून जमिनीची सुपीकता सुधारेल.बीजप्रक्रियेसाठी राईझोबियम, अझोटोबॅक्टर आणि पीएसबी यांसारख्या जैविक खतांचा वापर वाढवण्यावर भर दिला जाणार आहे. नॅनो खते मुबलक प्रमाणात उपलब्ध असल्याने, ड्रोनच्या सहाय्याने त्यांच्या फवारणीस प्रोत्साहन देण्यात येईल. पिकांमध्ये नत्र (N) व स्फुरद (P) ची कमतरता आढळल्यास १% युरिया व १-२% डीएपी द्रावणाची फवारणी करण्याबाबत शेतक-यांना आवाहन करण्यात येणार आहे. केंद्र सरकारच्या 'मृदा आरोग्य पत्रिका' अभियानांतर्गत शिफारस केल्यानुसार खतांची मात्रा देण्याचे आवाहन करण्यात येत आहे. राज्यात पारंपरिक कृषी विकास योजना आणि राष्ट्रीय नैसर्गिक शेती अभियानांतर्गत १.८१ लाख हेक्टर क्षेत्र नैसर्गिक शेतीखाली आणण्याचे उद्दिष्ट आहे. यामुळे रासायनिक खतांच्या खर्चात मोठी बचत होणार असल्याचे कृषीमंत्री भरणे यांनी सांगितले.

# विवाहितेवर अत्याचार, गरोदर होताच गर्भपाताच्या गोळ्या, खरातचा पाय खोलात, सहा वर्षांचा घटनाक्रम समोर

**नाशिक :** महिलांवरील अत्याचार, शस्त्राचा गैरवापर, गुंगीकारक औषधांसह बेहिशेबी मालमत्ता याबाबत भोंदूबाबा खरात प्रकरणात 'एसआयटी'ने तपास केल्यानंतर आता कुकर्मांसह गर्भपाताची 'चिकित्सा' सुरू केली आहे. अत्याचाराच्या गुन्ह्यात पोलिस कोठडीची मुदत संपल्याने न्यायालयीन आदेशान्वये संशयित अशोक खरातची नाशिकरोड मध्यवर्ती कारागृहात रवानगी करण्यात आली. मात्र, गर्भपाताच्या गुन्ह्यात 'एसआयटी'ने त्याचा ताबा मागितला असून, आज, गुरुवारी (दि. २) किंवा शुक्रवारी (दि. ३) त्याला पुन्हा न्यायालयात हजर केले जाणार आहे. विवाहित महिलेवर अत्याचार केल्याच्या गुन्ह्यात १८ मार्च २०२६ पासून नाशिक पोलिसांच्या कोठडीत असलेल्या संशयित खरातची पोलिस कोठडी संपल्याने बुधवारी (दि. १) सकाळी साडेअकरा वाजता त्याला नाशिक जिल्हा व सत्र न्यायालयात हजर करण्यात आले. मुख्य न्यायदंडाधिकारी बी. एन. इचपुराणी यांच्या न्यायकक्षात युक्तिवाद झाला. सरकारी पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता शैलेंद्र बागडे, तर संशयिताकडून सचिन भाटे यांनी युक्तिवाद केला.



यावेळी सरकारी अभियोक्ता तथा सहाय्यक संचालक किरण बेंडभरदेखील उपस्थित होत्या.सुनावणीवेळी विशेष तपास पथकाचे (एसआयटी) पोलिस उपअधीक्षक किरणकुमार सूर्यवंशी यांनी पहिल्या गुन्ह्यात न्यायालयीन कोठडीची मागणी केली. गर्भपात प्रकरणातील गुन्ह्यात संशयिताचा ताबा घेण्यासंदर्भात विनंती अर्ज दाखल केला. त्यानुसार न्यायालयाने खरातला चौदा दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली.दरम्यान, पुढील टप्प्यात खरातने पीडितेला गर्भपात करण्यासाठी दिलेले औषध कोठून आणले यासंदर्भात 'एसआयटी' तपास करीत आहे. त्यामध्ये कोणत्या डॉक्टरांचा सहभाग होता का, गर्भपात करण्यासाठी गोळ्या कोठून आणल्या यासंदर्भातही तपास सुरू आहे. त्यामुळे खरात प्रकरणात डॉक्टरही रडारवर असून, 'एसआयटी' आज, गुरुवारी न्यायालयात विस्तृत माहिती सांगण्याची शक्यता आहे.सरकारवाडा पोलिसांत भारतीय न्याय संहिता आणि जादूटोणा प्रतिबंध कायद्यान्वये २१ मार्च २०२६ रोजी गुन्हा नोंद आहे. संशयित अशोक खरात हा मूळचा कर्मयोगीनगर, नाशिक येथील रहिवासी आहे. त्याला अत्याचाराच्या गुन्ह्यात १७ मार्च २०२६ रोजी अटक झाली. चौदा दिवसांच्या पोलिस कोठडीनंतर त्याची रवानगी न्यायालयीन कोठडीत झाली. त्यानुसार सध्या खरात हा न्यायालयीन कोठडीत आहे. मात्र, सरकारवाडा पोलिसांत दाखल इतर गुन्ह्यांतील गांभीर्य, अघोरी प्रथांशी संबंध असल्यामुळे 'एसआयटी'चे तपास अधिकारी पोलिस उपअधीक्षक किरणकुमार सूर्यवंशी यांनी न्यायालयाकडे संशयिताचा 'ताबा वॉरंट' मिळण्याची विनंती नाशिक सत्र न्यायालयात लेखी स्वरूपात केली. न्यायालयाने मंजुरी दिल्यानंतर खरातचा पुढील गुन्ह्यात ताबा घेण्याचा मार्ग मोकळा झाला.

## बायको घर सोडून माहेरी गेली, पतीचं टोकाचं पाऊल; तिन्ही लेकरांना विष पाजून आयुष्य संपवलं

**सोलापूर :** जिल्ह्यात एका धक्कादायक घटनेमुळे खळबळ उडाली आहे. सोलापूरमधील तिन्हे गावात एका तरुणाने स्वतःच्या तीन मुलांना मारण्याचा प्रयत्न करून स्वतः आत्महत्या केल्याची घटना घडली आहे. पती-पत्नीच्या वादात तीन चिमुकल्यांवर दुर्दैवी वेळ आली आहे. पोटच्या तीन लेकरांना निर्दयी बापाने विष पाजले आणि स्वतः ही आत्महत्या केली आहे.भीमा अण्णा वाघमारे (वय 34) असे विष प्राशन केलेल्या व्यक्तीचे नाव आहे. भीमा वाघमारे हे एका सिमेंट कंपनीत सिक्युरिटी गार्ड म्हणून काम करत होते. अनेक महिन्यांपासून पती-पत्नीत घरगुती कारणावरून वादविवाद होत होते. याच वादातून भीमा वाघमारे यांच्या पत्नी त्यांना व तिन्ही मुलांना सोडून माहेरी गेल्या होत्या.भीमा वाघमारे आणि त्यांच्या पत्नीमध्ये गेल्या काही दिवसांपासून घरगुती आणि कौटुंबिक कारणांवरून वाद सुरू होता आणि काही दिवसांपूर्वी या वादातून पत्नी माहेरी निघून गेली होती. नातेवाईकांनी समजूत काढण्याचा प्रयत्न केला. मात्र, महिलेने सासरी परत येण्यास नकार दिला होता. याच मानसिक तणावातून भीमा वाघमारे यांनी आपल्या तीन लहान लेकरांना जिवे मारण्याचा प्रयत्न केला. ते रात्री



तिघांना वळसंग जवळील शेतात घेऊन गेले. त्या ठिकाणी त्यांनी तिन्ही मुलांना विष पाजले. त्यानंतर त्यांनी स्वत:ही विष प्राशन केलं.विष प्राशन केल्याने भीमा वाघमारे यांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. परंतु, वेळेत तिन्ही लहान मुलांना रुग्णालयात दाखल केल्याने त्यांचे प्राण वाचले. परंतु, सध्या तिन्ही लहान चिमुकल्यांची प्रकृती गंभीर आहे. तिन्ही मुलांवर सोलापूर येथील शासकीय रुग्णालयात उपचार सुरू आहे. डॉक्टरांकडून तिन्ही मुलांवर अतिदक्षता विभागात उपचार सुरू असून त्यांची प्रकृती चिंताजनक असून ते मृत्यूशी झुंज देत आहेत. या घटनेमुळे त्यांच्या संपूर्ण परिवारावर दुःखाचा डोंगर कोसळला असून परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. घटनेची माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी दाखल झाले असून पंचनामा करून पुढील तपास सुरू केला आहे.

## आरोपी निघाला अंमली पदार्थ रॅकेटचा मास्टरमाईंड

**पुणे :** पुण्यातली एक साधी वाटणारी अपहरणाची केस पोलिसांसाठी मोठी धक्कादायक ठरली. कारण, याची सुरुवात झाली ती एका अल्पवयीन मुलीच्या बेपत्ता होण्यापासून... पण तपास जसजसा पुढे गेला, तसतसं चित्र पूर्ण बदलत गेलं आणि अखेर पोलिसांच्या हाती अंमली पदार्थांच्या मोठ्या रॅकेटचा धागा लागला.पुण्यातील उत्तमनगर परिसरात ही तक्रार नोंदवली गेली होती. सुरुवातीला पोलिसांचा फोकस प्रेम प्रकरणावर होता. पण आरोपीपर्यंत पोहोचल्यावर वेगळंच वास्तव समोर आलं. सुनील गोपाळ राठोड ऊर्फ राठ्या राठोड नावाचा तरुण या प्रकरणात मुख्य आरोपी असल्याचं निष्पन्न झालं. तो बराच काळ पोलिसांपासून लपून बसला होता. शेवटी कोंढवे धावडे भागातून त्याला अटक करण्यात आली.उत्तमनगर पोलिस ठाण्यात १७ वर्षीय मुलीच्या अपहरणाचा गुन्हा दाखल झाला होता. प्रेम प्रकरणातून मुलगी पळून गेल्याचे समोर आले होते. आरोपीने अल्पवयीन मुलीशी लग्नही केले. या गुन्ह्यातील आरोपी राठ्या राठोड हा काही महिन्यांपासून फरारी होता. पोलिसांना माहिती मिळाली, की राठोड अंमली पदार्थांच्या व्यवहारात सक्रिय आहे.

## मुलाला संपवायला ७५ लाखांची सुपारी

**पुणे :** पुण्यातील एका थरारक सुपारी किलिंग कटाला अखेर मोठं वळण मिळालं आहे. तब्बल दोन वर्षे फरार असलेला आणि शूटरांना पिस्तुल पुरवणारा सराईत गुन्हेगार पोलिसांच्या जाळ्यात अडकला आहे. कौटुंबिक वादातून स्वतःच्या मुलालाच संपवण्यासाठी ७५ लाखांची सुपारी दिल्याच्या या प्रकरणाने शहर हादरलं होतं. या प्रकरणात अटक करण्यात आलेला आरोपी निलेश श्रीकांत गायकवाड (वय २४, रा. पिसोळी) असून, तो या कटातील महत्त्वाचा दुवा असल्याचे समोर आले आहे.१६ एप्रिल २०२४ रोजी दुपारी जंगली महाराज रोडवरील कार्यालयाबाहेर बसलेल्या व्यावसायिक धीरज अरगडे यांच्यावर दुचाकीवरून आलेल्या दोन जणांनी गोळीबार करण्याचा प्रयत्न केला होता. गाडीत बसून एसी सुरू केल्यानंतर त्यांनी काच खाली केली, इतक्यात मागे बसलेल्या आरोपीने पिस्तुल रोखून ट्रिगर दाबला. मात्र, गोळीच न झाडल्याने अरगडे थोडक्यात बचावले. घाबरून त्यांनी आरडाओरडा सुरू केला, तर “तू आता वाचला रे...” असे म्हणत आरोपी घटनास्थळावरून पसार झाले.या घटनेनंतर गुन्हे शाखेने तपास हाती घेतला असता, धक्कादायक कट उघड झाला. धीरज अरगडे यांच्या वडिलांनीच कौटुंबिक वादातून मुलाच्या




हत्येसाठी ७५ लाखांची सुपारी दिली होती. त्यापैकी २० लाख रुपये आधीच देण्यात आले होते, तर शूटरांना ५ लाख रुपये देण्यात आले होते. या कटात एकूण १० आरोपींचा सहभाग निष्पन्न झाला असून, त्यापैकी ६ जणांना आधीच अटक झाली होती.दरम्यान, शूटरांना पिस्तुल पुरवणारा निलेश गायकवाड हा फरार होता. ३० मार्च रोजी काळेपडळ परिसरात पेट्रोलिंगदरम्यान पोलिसांना तो पिसोळी येथे आईला भेटण्यासाठी येणार असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार सापळा रचून त्याला अटक करण्यात आली. चौकशीत त्याने गुन्ह्यातील सहभाग मान्य केल्याचे पोलिसांनी सांगितले.

## इंजिनिअर होण्याचं स्वप्न अधुरं, 19 वर्षीय तरुणीने आयुष्याची दोर कापली, कारण अस्पष्ट

**नांदेड :** नांदेडमधील विष्णुपुरी परिसरातील ग्रामीण तंत्रनिकेतन महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या एका 19 वर्षीय विद्यार्थिनीचा वसतीगृहात गळफास घेतलेल्या अवस्थेत पार्थिव आढळून आल्यानं एकच खळबळ उडाली आहे. आज बुधवारी सकाळी १० वाजेच्या सुमारास ही घटना घडली असून ही तरुणी हिमायतनगर तालुक्यातील वाघी येथील रहिवासी होती.मृत तरुणी ही ग्रामीण तंत्रनिकेतन महाविद्यालयात इलेक्ट्रॉनिक एन्ड टेलीकम्युनिकेशन शाखेच्या द्वितीय वर्षात शिक्षण घेत होती. विशेष म्हणजे तिचा भाऊ देखील त्याच वर्गात शिक्षण घेत असल्याची माहिती आहे. महाविद्यालयात सध्या अंतर्गत परीक्षा सुरू आहेत. आज बुधवारी सकाळी



८ ते ९.३० या वेळेत तिचा पेपर होता. तिने पेपर पूर्ण केल्यानंतर आपल्या हॉस्टेलच्या मैत्रिणीसोबत ती वसतीगृहात गेली. आपल्या काकांना फोन करून 'पेपर चांगला गेला' अशी माहिती दिली होती. त्यानंतर ती आपल्या रूममधील मैत्रिणीसोबत काही वेळ फिरायला गेली. थोड्या वेळानंतर मैत्रीण जेवण करण्यासाठी गेली आणि काही वेळाने परत आल्यानंतर तिचं पार्थीव वसतीगृहात गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आलं. ही घटना लक्षात येताच महाविद्यालय परिसरात एकच गोंधळ उडाला. घटनेची माहिती मिळताच महाविद्यालयातील कर्मचाऱ्यांनी पार्थीव खाली उतरवून शासकीय रुग्णालयात नेलं. पण डॉक्टरांनी तिला मृत घोषित केलं.मृत तरुणी ही अत्यंत हुशार आणि अभ्यासू विद्यार्थिनी म्हणून ओळखली जात होती. अभियंता होण्याचं तिचं स्वप्न होतं. तिच्या अचानक मृत्यूमुळे मित्र-मैत्रिणींसह महाविद्यालयातील शिक्षकांमध्येही हळहळ व्यक्त केली जात आहे. दरम्यान, या घटनेनंतर नातेवाईकांनी महाविद्यालय प्रशासनावर गंभीर आरोप केले आहेत. घटना घडल्यानंतर ही कुटुंबीयांना माहिती देण्यात आली नाही, असा आरोप त्यांनी केला आहे. तसेच नातेवाईकांना कळवण्यापूर्वीच महाविद्यालयातील कर्मचाऱ्यांनी पार्थीव खाली उतरवून रुग्णालयात हलविल्याचा आरोपही करण्यात आला आहे. त्यामुळे या प्रकरणात संशयाचं वातावरण निर्माण झालं आहे.दरम्यान, आत्महत्येचं कारण अद्याप अस्पष्ट आहे. ग्रामीण पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद करून पुढील तपास सुरु केला आहे. आहे. दरम्यान, या घटनेमुळे विद्यार्थ्यांच्या वसतीगृहातील विद्यार्थांच्या सुरक्षतेचा प्रश्न निर्माण झाला आहे.

# लखनौचा संपूर्ण संघ फ्लॉप ठरला, पण 25 वर्षीय आयुष बदोनी ठरवलं व्हिलन; पराभवानंतर पंतने कारणं दिले

**लखनौ/वृत्तसंस्था :** लखनौच्या एकाना क्रिकेट स्टेडियमवर एक रोमांचक सामना पाहायला मिळाला. नाणेफेक गमावून प्रथम फलंदाजी करताना लखनौ सुपर जायंट्स संघ घरच्या मैदानावर 20 षटकेही पूर्ण करू शकला नाही आणि 18.4 षटकांत 141 धावांवर गारद झाला. याउलट दिल्लीने 17 चेंडू शिल्लक असताना सामना 6 विकेट्सने जिंकला. सामना गमावल्यानंतर कर्णधार ऋषभ पंत काय म्हणाला पाहा.जेव्हा ऋषभ पंतला त्याच्या धावबाद होण्याबद्दल विचारले असता, त्याने उत्तर दिले की "या घटनेला सामोरे जाण्याचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे ती विसरून जाणे. त्याने पुढे सांगितले की, ही एक अशी गोष्ट आहे जी तुम्ही नियंत्रित करू शकत नाही आणि तिचा जास्त विचार केल्याने तुम्ही आणखी मागे पडता. पंतने स्पष्ट केले की, त्याच्या फलंदाजीच्या कामगिरीमुळे त्याला अशा खेळाडूची गरज होती जो फलंदाजी आणि गोलंदाजी दोन्हीमध्ये योगदान देऊ शकेल आणि म्हणूनच शहबाज अहमदला 'इम्पॅक्ट सब' म्हणून संघात आणले गेले."पंत म्हणाला की, "आयुष बडोनीची भूमिका स्पष्टपणे ठरलेली आहे, विशेषतः जेव्हा संघ सुरुवातीलाच विकेट गमावतो;




बडोनीकडून पुढे येऊन डावाला स्थैर्य देण्याची अपेक्षा असते. गोलंदाजीमध्ये संघाला आलेला संघर्ष हा सामन्याचा एक सकारात्मक पैलू होता. अतिरिक्त धावा संघासाठी हानिकारक ठरू शकतात, विशेषतः कमी धावसंख्येचा बचाव करताना, कारण खेळाडू अनेकदा अतिरिक्त करण्याचा प्रयत्न करतात." बडोनी आजच्या सामन्यात शून्यावर बाद झाला. त्यामुळे पंत आता बडोनीच्या कामगिरी नाखुश आहे की काय असा प्रश्न उपस्थित होत आहे.मार्श आणि मार्करम यांची सलामीची जोडी का बदलली, असे विचारले असता, त्याने स्पष्ट केले की "मला डावाच्या सुरुवातीला डावखुरा-उजवा फलंदाज यांच्या संयोजनाचा प्रयोग करायचा होता. मी सलामीला खेळणे सुरू ठेवेल की नाही याची शक्यता 50-50 आहे, परंतु त्याने वरच्या फळीत खेळणे सुरू ठेवण्याचे संकेत दिले." पंत म्हणाला.

दिल्लीकडून समीर रिझवी आणि ट्रिस्टन स्टब्सने चांगली कामगिरी केली. रिझवीने नाबाद 70 धावा केल्या तर स्टब्सने नाबाद 39 धावा केल्या. लखनौकडून सर्वाधिक धावा या अब्दुल शमदने केल्या. अब्दुलने 35 धावा केल्या. दिल्लीकडून लुंगी एनगिडी आणि टी. नटराजनने प्रत्येकी 3 विकेट काढल्या. कुलदीप यादवने दोन तर अक्षर पटेलने एक विकेट काढली. लखनौकडून प्रिन्स यादवने दोन तर मोहसिन खान आणि मोहम्मद शमीने प्रत्येकी एक विकेट काढली.

# हैदराबादला कोलकाताविरुद्धही मिळू शकतो पराभवाचा झटका; मॅचपूर्वी आली महत्त्वाची अपडेट समोर

**मुंबई/वृत्तसंस्था :** आयपीएल 2026 हंगामात सनरायझर्स हैदराबादची सुरुवात खराब झाली आहे. कर्णधार पॅट कमिन्स दुखापतीमुळे संघाबाहेर आहे, तर इशान किशनच्या नेतृत्वाखालील संघाला आरसीबीकडून मोठा पराभव पत्करावा लागला आहे. हैदराबादची गोलंदाजी कमकुवत राहिली आहे. हैदराबादचा पुढील सामना कोलकाता नाईट विरुद्ध असणार आहे. आता या सामन्यापूर्वी हैदराबादला एक मोठा धक्का बसला आहे. उद्याचा सामना ईडन गार्डनच्या मैदानावर रंगेल. या सामन्यापूर्वी एक महत्वाची अपडेट समोर आली आहे. हैदराबादचा आणखी एक प्रमुख वेगवान गोलंदाज दुसऱ्या सामन्यासाठी तंदुरुस्त दिसत नाही. हैदराबादचा केकेआरविरुद्धचा सामना 2 एप्रिल रोजी होणार असून, Brydon Carse अद्याप पूर्णपणे बरा झालेला नाही. इंग्लंडचा वेगवान गोलंदाज ब्रायडन कार्स 28 मार्च रोजी आरसीबीविरुद्धच्या सामन्याच्या एक दिवस आधी सरावादरम्यान जखमी झाला. त्याच्या हाताला दुखापत झाली, ज्यामुळे तो आरसीबीविरुद्धच्या सामन्यातून बाहेर पडला. पहिला सामना गमावल्यानंतर डॅनियल व्हेटोरीने तो लवकरच परत येईल असे सांगितले होते, परंतु आता, मीडिया रिपोर्ट्सनुसार, कार्स पूर्णपणे तंदुरुस्त नसल्याचे मानले जात आहे आणि




तो केकेआरविरुद्धच्या आगामी सामन्यातून बाहेर पडू शकतो.कमिन्सशिवाय सनरायझर्स हैदराबादची गोलंदाजी खूपच कमकुवत दिसत आहे. पदार्पण करणाऱ्या डेव्हिड पेनने मागील सामन्यात चांगली गोलंदाजी केली, पण त्याला इतर गोलंदाजांकडून साथ मिळाली नाही. यामुळे आरसीबीला हैदराबादविरुद्ध केवळ 15.4 षटकांत 200 हून अधिक धावांचा सर्वात जलद पाठलाग करणे शक्य झाले. आरसीबीकडून विराट कोहलीने नाबाद 69 धावा आणि देवदत्त पडिक्कलने धडाकेबाज 61 धावा केल्या. 2 एप्रिल रोजी केकेआरविरुद्ध विजय मिळवायचा असेल, तर हैदराबादला आपल्या गोलंदाजीत सुधारणा करावी लागेल. दरम्यान, पहिला सामना गमावल्यानंतर केकेआरदेखील विजयाच्या मार्गावर परतण्याचा प्रयत्न करेल. कमिन्सच्या अनुपस्थितीत इशान किशन हैदराबादच्या संघाची धुरा सांभाळत आहे. इशान किशनच्या कर्णधारपदात पहिला सामना हैदराबादने गमावला. त्यामुळे आता दुसरा सामन्यात हैदराबादचा संघ कशी कामगिरी करतो याकडे सर्वांचे लक्ष लागून असणार आहे.

# ऑस्ट्रेलियाकडून सेंट्रल कॉंट्रॅक्टची यादी जाहीर, मॅक्सवेलला बाहेरचा रस्ता

**मुंबई/वृत्तसंस्था :** क्रिकेट ऑस्ट्रेलियाने सेंट्रल कॉंट्रॅक्टची यादी जाहीर केली असून यामध्ये २१ खेळाडूंचा समावेश आहे. या यादीमध्ये मात्र यातून स्टार खेळाडू ग्लेन मॅक्सवेल याला वगळल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे. मॅक्सवेलसारख्या अनुभवी आणि तगड्या खेळाडूला कॉंट्रॅक्टमधून बाहेर ठेवले असून काही नवख्या खेळाडूंना संधी मिळाली आहे. क्रिकेट ऑस्ट्रेलियाने आगामी १२ महिन्यांच्या शेड्यूलनुसार खेळाडूंची निवड केल्याचं दिसत आहे.आता येत्या ऑगस्टमध्ये बांगलादेशविरुद्ध कसोटी मालिका खेळून परदेश दौऱ्यावर दक्षिण आफ्रिका, न्यूझीलंड आणि भारताविरुद्ध कसोटी मालिका खेळणार आहेत. वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशीपमध्ये जाण्यासाठी या सर्व मालिका कांगारूंसाठी महत्त्वाच्या आहेत. ऑस्ट्रेलिया क्रिकेट निवड समितीचे अध्यक्ष जॉर्ज बेली यांनी संघ निवडीबाबत सांगताना, जे खेळाडू सर्व फॉरमॅट खेळू शकतात अशांना प्राधान्य दिले आहे. ज्या खेळाडूंना स्थान दिले गेले नाही असे खेळाडू चांगली कामगिरी करून पुन्हा एकदा करारामध्ये सहभागी होऊ शकतातसॅम कॉन्स्टास, लान्स मॉरिस, ग्लेन मॅक्सवेल, मॅट शॉर्ट यांचे करार संपवले आहेत. तोच सॅम कॉन्स्टास जो जसप्रीत बुमराह याला मागील बॉर्डर गावस्कर मालिकेतील एका सामन्यात





भिडला होता. दोघांमध्ये शाब्दिक चकमकही झाल्याचं पाहायला मिळालं होतं. त्यालाही वगळण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. उस्मान ख्वाजाचाही समावेश असून त्याने निवृत्ती जाहीर केली आहे. फिरकीपटू टॉम मर्फी, ब्रँडन डॉगेट आणि जेक वेदरॉल्ड यांना सहभागी करण्यात आले आहे. एकंदरित सर्व संघ पाहता कसोटी मालिका डोळ्यासमोर ठेऊन केला गेला दिसत आहे. त्यामुळे मॅक्सवेलला बाहेर ठेवलं गेलं असू शकतं.


# स्टबसची खेळी मॅचविनिंग ठरली नाही तर; पटेलने सांगितला वेगळाच पॉइंट

**लखनौ/वृत्तसंस्था :** आयपीएल 2026 च्या पाचव्या सामन्यात दिल्ली कॅपिटल्सने लखनौ सुपर जायंट्सविरुद्ध दणदणीत विजय मिळवला. लखनौच्या एकाना स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या या सामन्यात दिल्लीने 142 धावांचे लक्ष्य सहज गाठले आणि लखनौवरील आपले वर्चस्व कायम राखले. हा दिल्ली कॅपिटल्सचा सलग पाचवा आयपीएल विजय ठरला. 2023 पासून दिल्ली लखनौविरुद्ध एकही सामना हरलेली नाही. दमदार विजयानंतर कॅप्टन अक्सर पटेल काय म्हणाला ते पाहा.

पटेलने स्पष्ट केले की, "इम्पॅक्ट प्लेअरच्या भूमिकेसाठी त्यांना समीर रिझवी आणि आशुतोष शर्मा यांच्यापैकी एकाची निवड करायची होती. आपल्या गोलंदाजी संघाचेही कौतुक केले, ज्याने प्रतिस्पर्धी संघाला एका चांगल्या धावसंख्येवर रोखले." पटेलने सांगितले की, "सामन्याच्या त्या महत्त्वाच्या टप्प्यावर रिझवी आणि स्टब्स यांच्यातील भागीदारी निर्णायक ठरली."सामना लवकर संपला, पण मधल्या टप्प्यात तो खूपच रोमांचक होता. आम्हाला फक्त एका चांगल्या भागीदारीची गरज होती आणि ब्रेकदरम्यान आम्ही त्यावरच चर्चा केली. मी गोलंदाजी संघाच्या प्रयत्नांवर खूप खूश आहे. जेव्हा आम्ही गोलंदाजी सुरू केली, तेव्हा आम्हाला माहित होते की गोलंदाजांना खेळपट्टीकडून थोडी मदत मिळेल; गोलंदाजीसाठी आलेल्या प्रत्येक गोलंदाजाला आम्ही ही गोष्ट सांगितली होती," असे दिल्ली कॅपिटल्सचा कर्णधार अक्षर पटेल सामन्यानंतर म्हणाला. अक्षरच्या मते गोलंदाजांनी केली गोलंदाजी सामन्यासाठी टर्निंग पॉइंट ठरली असावी असं वाटतेय."तुम्ही बघू शकता की सामना कसा पुढे सरकत होता; काही ठिकाणी बाउंड्री मोठ्या होत्या तर काही ठिकाणी लहान. मी कोणत्या गोलंदाजाला गोलंदाजी करायची याचा विचार करत होतो; कदाचित शेवटी माझा अंदाज थोडा चुकला. समीर रिझवीला खेळवण्याची आमची योजना होती, पण आमच्याकडे आशुतोष शर्मला खेळवण्याचा पर्यायही होता. गेल्या वर्षी आशुने पहिल्या सामन्यात असे केले होते आणि यावेळी रिझवीने. तो [समीर रिझवी] आपल्या खेळावर खूप मेहनत घेतो आणि आपण आणखी सुधारणा कशी करू शकतो, याचा सतत विचार करत असतो," असे तो पुढे म्हणाला.



# ब्रेकअपचं खोटं कारण ते बाबांचा अपघात झाल्याची खोटी बातमी, मराठी कलाकारांनी शेअर केल्या 'एप्रिल फूल डे'च्या आठवणी

माझा मुलगा शाळेत असताना त्यानं मला एप्रिल फूल केलं होतं. तो आठवीत असताना त्यानं मला फोन केला, की मी पडलो आणि पायाला फॅक्चर झालं आहे. आपल्या पोराला काही खुट्ट झाल्याचं वाटलं, तरी आईला कुठला दिवस, कुठला महिना हे लक्षात येत नाही, ती धावत सुटते पोरापाशी. माझंही तसंच झालं. त्याचं फोनवरचं बोलणं ऐकून मी धावत जाणार, हे त्यालाही माहीत होतं. त्यावेळी कामानिमित्त मी माझ्या घरापासून दूर राहायचे. कामात व्यग्र असल्यानं तसंही मला घरी फार जाता यायचं नाही. पण त्यादिवशी लेकाच्या फोनमुळे मी थेट अंबरनाथ गाठलं. घरी गेल्यावर बघते तर तो माझ्यासमोर एकदम ठणठणीत उभा आणि माझी मात्र दांडीगुल झाली होती. तो दिसेपर्यंत मी खूप काळजीत होते. त्यानंतर त्याला मी खूप ओरडले.आमच्या 'स्ट्रगलर साला' ग्रुपमध्ये संतोष जुवेकर सगळ्यात जास्त खोडकर आहे. एकदा त्यानं रडत-रडत फोन केला आणि ब्रेकअप झाल्याचं सांगून मला, अभिजीत चव्हाण आणि विजू मानेंना तातडीनं घरी बोलावलं. आम्ही तिघंही प्रचंड टेन्शनमध्ये आपापल्या घरून निघालो. संतोष खूप भावूक असल्यानं आम्हाला त्याची काळजी वाटत होती. पण त्याच्या घरी पोहोचलो; तेव्हा दृश्य काही वेगळंच होतं! 'स्ट्रगलर साला'ला मिळालेल्या यशाची पार्टी साजरी करण्यासाठी त्यानं हा सगळा बनाव रचला होता. सरळ सांगितलं असतं; तर कुणी आलंच नसतं, म्हणून त्यानं आम्हाला असं 'एप्रिल फूल' बनवून एकत्र जमवलं !१२ डिसेंबरला माझा वाढदिवस होता आणि त्याच दिवशी दिग्दर्शक विजू माने यांनी 'मामाच्या गोव्याला जाऊया' या सिनेमाचं संहितावाचन ठेवलं होतं. मी मोठ्या उत्साहात तिथे गेलो; पण वाचन संपल्यावर विजू अचानक म्हणाले, 'मी हा सिनेमा तुम्हा जुन्या कलाकारांसोबत करत नाहीयं, मी नवीन मुलं घेणार आहे; फक्त कुशल या सिनेमात असेल.' हे ऐकून मला इतका राग आला होता, की मी तिथून भांडून निघून गेलो आणि रागाच्या भरात विजू यांना ब्लॉक करून टाकलं! नंतर कुशल आणि इतरांचे खूप फोन येत होते, पण मी कोणाचंच बोलणं ऐकलं नाही. शेवटी दुसऱ्या नंबरवरून विजू यांचा फोन आला आणि तेव्हा समजलं की, ते सगळे मिळून माझी फिरकी घेत होते! माझ्या वाढदिवशीच या मित्रांनी मला असं 'फूल' बनवलं होतं.

एप्रिल फूल' म्हटलं, की सगळ्यात आधी बाबांची आठवण येते. आम्ही दहिसरला राहायचो, तेव्हा बाबांच्या एका मित्रानं घरी येऊन बाबांचा अपघात झाल्याची खोटी बातमी दिली. आई इतकी घाबरली, की मला घेऊन ती तातडीनं बाहेर पडली. योगायोगानं वाटेत बाबाच भेटले. आईनं धापा टाकत त्यांनाच ही बातमी सांगितली, तेव्हा बाबा हसून म्हणाले, 'अगं आज तारीख बघ काय आहे!' आई तेव्हा खूप भडकली होती, पण बाहेरच्या व्यक्तिपेक्षा घरच्यांनीच केलेलं ते एप्रिल फूल कायम लक्षात राहिलं.

दुसरीकडे, १ एप्रिलला सगळेच सावध असतात, म्हणून मी काही दिवस आधीच गेम खेळते. नुकताच मी माझा मित्र सागर याला 'खूप अर्जेंट बोलायचं आहे', असा मेसेज करून सोडून दिलं. तो इतका टेन्शनमध्ये आला, की त्याचे १० मिसकॉल आले. शेवटी व्हिडीओ कॉलवर त्याला सांगितलं की, '१ तारखेला तू फसला नसतास, म्हणून ४ दिवस आधीच तुला फूल बनवलं!'

## प्राजक्ता माळी लग्न कधी करणार? अखेर सोडलं मौन, म्हणाली...



मराठी चित्रपट आणि मालिकांच्या विश्वातील लोकप्रिय अभिनेत्री प्राजक्ता माळी कायमच लाइमलाइटमध्ये. कधी आपल्या अभिनयासाठी तर कधी विनम्र स्वभावासाठी नेहमीच चर्चेत असते. 'महाराष्ट्राची हास्यजत्रा' या कार्यक्रमाचं सूत्रसंचालन करणारी प्राजक्ता अभिनयासोबत निर्मिती क्षेत्रातही सक्रिय झाली आहे. तिचा मोठा चाहतावर्ग असल्याने तिच्या वैयक्तिक आयुष्याबाबतही चर्चा नेहमीच होत असते. विशेषतः ती कधी लग्न करणार, याकडे चाहत्यांचे विशेष लक्ष असते.अशातच प्राजक्ताने इन्स्टाग्रामवर 'आस्क मी एनीथिंग' सेशन घेतले. यावेळी एका चाहत्याने तिला नेहमीचा प्रश्न विचारला "लग्न कधी करणार?" यावर प्राजक्ता माळीने सडेतोड आणि मजेदार उत्तर दिले. प्राजक्ता म्हणाली, "हा माझ्या आई-वडिलांचा प्रश्न आहे, तुझा नाही." तिने दिलेले उत्तर पाहून अनेकांना असे वाटत आहे की प्राजक्ता आता लग्न करणार आहे की नाही.दुसऱ्या एका चाहत्याने तिच्या विनम्रतेबद्दल विचारले असता प्राजक्ताने दिलेले उत्तर देखील चर्चेचा विषय ठरले. ती म्हणाली, "आयुष्याने दिलेले फटके." याशिवाय, एका चाहत्याने तिला विचारले की, गश्मीर महाजनी, अंकुश चौधरी आणि ललित प्रभाकर यांच्यातील तुझा आवडता सहकलाकार कोण? यावर प्राजक्ताने दिलेले उत्तरही लक्ष वेधून घेणारे होते. ती म्हणाली, "तुम्हीच ओळखा!"कामाच्या बाबतीत प्राजक्ता माळी सध्या चर्चेत आहे. काही दिवसांपूर्वी तिने एका तेलुगु दिग्दर्शकासोबत पाठमोरा फोटो शेअर करत "काहीतरी शिजतंय..." असे कॅप्शन दिले होते. यामुळे तिच्या नवीन प्रोजेक्टबाबत उत्सुकता निर्माण झाली आहे.

## बाथरूम अस्वच्छ, चांगली व्हॅनिटी व्हॅन पुरुषांना जेनिफरनं सांगितला तारक मेहता मालिकेच्या सेटवरचा अनुभव



अभिनेत्री जेनिफर मिस्त्रीला 'तारक मेहता...' या मालिकेमुळे लोकप्रियता मिळाली. मात्र, तिनं या मालिकेचा निरोप घेतला. अशातच आता नुकत्याच एका मुलाखतीमध्ये जेनिफरने 'तारक मेहता...' या मालिकेच्या सेटवरचा अनुभव सांगितला

जेनिफर मिस्त्रीने नुकतीच 'बॉलिवूड बबल'ला मुलाखत दिली. यादरम्यान 'तारक मेहता...' मालिकेबद्दल बोलताना जेनिफर म्हणाली की, 'आम्ही १२-१४ तास काम करायचो. दिशा खूप काम करायची. तिने ३० तास काम केलेलं आहे. असित मोदींची यामध्ये चूक असेल असं मला वाटत नाही. कारण त्यांच्यापर्यंत कदाचित या गोष्टी पोहचतच नसतील. आम्ही जेवायला बसायचो तेव्हा झुरळं असायची, बाथरूम स्वच्छ नसायचं, हे आम्ही प्रोडक्शनला सांगायचो. आमच्या रूममध्ये अस्वच्छता असायची. मी आणि सोनालिका जोशी आम्ही घरातून झाडू आणायचो आणि साफ करायचो. आम्ही स्वतः बाथरूम स्वच्छ केलं आहे. या गोष्टी त्यांच्यापर्यंत कधी पोहोचल्याच नाहीत. त्यांचं असं होत असेल की, या लहान सहान गोष्टींकडे मी लक्ष दिलं तर बाकीचं काम कोण करणार. काही वेळा तर ते दुर्लक्ष करायचे.जेनिफर पुढे म्हणाली की, 'हे तर खरं आहे की, सगळ्यात स्वच्छ आणि चांगल्यातली चांगली व्हॅनिटी व्हॅन पुरुषांना दिली जायची आणि अस्वच्छ व्हॅनिटी व्हॅन महिला कलाकारांना दिली जायची, त्यातही तीन महिला कलाकारांना एक व्हॅनिटी द्यायचे. मी जेव्हा असित सरांना सांगितलं तेव्हा ते म्हणाले, तूच का बोलत आहेस बाकीचे काहीच बोलत नाही. तुझ्या खांद्यावर बंदूक ठेवली जात आहे. तेव्हा मला वाटलं की, बरोबरच बोलत आहेत ते, बाकीचे कोणीच काहीच बोलत नाहीये; मग मी बोलणं सोडलं. पण, त्यानंतर त्या गोष्टी अजूनच चुकीच्या पद्धतीने घडू लागल्या, तेव्हा मला खूप असह्य झालं. पण, 'तारक मेहता...' मध्ये पुन्हा पदार्पण झालं होतं, मग शो सोडू शकत नव्हते. म्हणून, मी विचार केला की चांगले पैसे मिळत आहेत, लोकप्रियताही मिळत आहे, जाऊदे! प्रोडक्शनचा त्रास सहन करते, १५ दिवस तर सेटवर असते १५ दिवस तर घरीच असते.'पण, देवाला ते नको होतं म्हणून एका क्षणात त्यांनं मला तिथून काढलं. ७ मार्च २००८ मध्ये माझी या मालिकेसाठी निवड झाली. ७ मार्चलाच माझं लग्न झालं आणि ७ मार्च २०२३ मध्येच मी मालिकेचा निरोप घेतला. मी याबद्दल कधी विचारही केला नव्हता. हे सगळं नशीबात लिहिलेलं होतं.' असं जेनिफरने सांगितलं आहे.

# अशोक खरात प्रकरणी सोनाली कुलकर्णीची संतापजनक पोस्ट




सध्या भारतामध्ये दोन प्रकरणं भरपूर गाजत आहेत. एक म्हणजे जगात उद्भवलेली युद्धजन्य परिस्थिती आणि दुसरं म्हणजे अशोक खरात. या भोंदू बाबाचे पितळ उघड पडल्यानंतर पोलिसांनी त्याला बेड्या ठोकल्या. चौकशी दरम्यान त्याच्या बाबतीत अनेक भयंकर सत्य समोर आली. यातून हे देखील समजले की जग कितीही पुढारलेले असले, विज्ञान जगात जगत असले तरीही बरेच सुशिक्षित लोकच अशा भोंदू बाबांना खतपाणी घालून समाजात नको ते प्रकार करण्यास प्रोत्साहन देतात. आपण देव आहोत, आपल्याकडे दैवी शक्ती आहे, मी तुला संकट मुक्त करीन अशा थापा मारून हा अशोक खरात नावाचा भोंदू बाबा महिलांचे शोषण करायचा, महिला सुद्धा अगदी डोळ्यावर पट्टी बांधल्याप्रमाणे त्याला अधीन व्हायच्या. त्याच्या अनेक आक्षेपार्ह क्लिप्स व्हायरल झाल्यामुळे त्याचे हे घाणेरडे सत्य समोर आले. विशेष म्हणजे राजकारणातील अनेक मोठी नावं सुद्धा या भोंदू बाबाच्या आहारी गेली होती.दिवसेंदिवस जसजसा या प्रकरणाचा तपास खोलात जात आहे तसतसे याबाबत अनेक धक्कादायक गोष्टी समोर येत आहे. अनेक जण यावर व्यक्त होत असताना अभिनेत्री सोनाली कुलकर्णी यांनी सुद्धा स्वतःच्या मनातला संताप एका पोस्ट द्वारे बाहेर काढला. तसेच समाजाला आता तरी झोपेतून जागे व्हायला आवाहन केले.सोनाली कुलकर्णी यांनी आपल्या पोस्टमध्ये लिहिले की,

आता तरी श्रध्दा आणि अंधश्रद्धा ह्यातला फरक समजून घेऊया..
महिलांवर घृणास्पद अत्याचार, लैंगिक खुळाचार, आर्थिक फसवणूक, ऐय्याशी, भावनिक शोषण.. दांभिकता..
किती संतापजनक, केवढी पिळवणूकअजूनही आपण म्हणणार का - की आमच्याच धर्मातली अंधश्रध्दा का दिसते..
आपल्या उंबरठ्यावर पडलेली घाण स्वच्छ करायला नको..?
की माझी ती पवित्र अस्वच्छता आणि दुसऱ्याची ती दुर्गंधी..???
महाराष्ट्रात, आपल्या भवताली हे घडतंय..
आपण ठगले जातोय.. जागे होऊया यावर अनेक सोशल मीडिया युजर्सनी सुद्धा त्यांची मतं नोंदवली आहेत. अशोक खरात सारखी माणसं एकप्रकारची वृत्ती आहेत जी लोकांच्या श्रद्धेचा गैरफायदा घेतात असे बऱ्याच जणांचे म्हणणे आहे.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# बुलडाणा नगरीत महामानवांच्या जयंती महोत्सवाचा जयघोष...

## शहरातील सर्व नागरिकांनी या भव्य महोत्सवाच्या कार्यक्रमात मोठ्या संख्येने उपस्थितीत रहा-समितीचे अध्यक्ष पवन भालेराव

जनसंचलन/बुलढाणा

बुलढाणा नगरीत सध्या महामानवांच्या जयंती उत्सवाचा मोठा उत्साह पाहायला मिळत आहे. राष्ट्रपिता महात्मा जोतीराव फुले आणि विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त शहरात चार दिवस विविध भव्य कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. सार्वजनिक जयंती उत्सव समिती, बुलढाणा - २०२६ च्या माध्यमातून वैचारिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांची मेजवानी बुलढाणेकरांना मिळणार आहे. बुलढाणा शहरात ११ ते १४ एप्रिल या काळात हा महोत्सव रंगणार आहे. यंदाच्या उत्सवाचे मुख्य आकर्षण म्हणजे सुप्रसिद्ध गायक आनंद शिंदे, संतोष जोंधळे यांचा भीम गीतांचा कार्यक्रम आणि प्रा. विठ्ठल कांगणे यांचे व्याख्यान. या संपूर्ण सोहळ्याचे नियोजन सार्वजनिक जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष पवन भालेराव यांच्या नेतृत्वाखाली केले जात आहे.दरवर्षी प्रमाणे या वर्षी सुध्दा मोठ्या उत्साहात विविध कार्यक्रम साजरा होणार आहे ११ एप्रिल रोजी सायंकाळी ६ वाजता जिजामाता प्रेक्षागार येथे आनंद शिंदे यांचा गाण्यांचा कार्यक्रम होणार आहे.

१२ एप्रिल रोजी सायंकाळी ६ वाजता गांधी भवन येथे प्रा. विठ्ठल कांगणे यांचे जाहीर व्याख्यान यांचा कार्यक्रम होणार आहे. १३ एप्रिल रोजी सायंकाळी ६ वाजता संतोष जोंधळे यांचा सुरेल कार्यक्रम आणि रात्री १२ वाजता भव्य फटाक्यांची आतषबाजीत साजरा होणार आहे. आणि १४ एप्रिल रोजी सकाळी ८ वाजता भीमपाळणा, ९ वाजता मोटारसायकल रॅली आणि दुपारी ४ वाजता मुख्य भव्य मिरवणूक निघणार आहे. आज या महोत्सवाच्या रथाचे भव्य उद्घाटन पार पडले. यावेळी बोलताना



समितीचे अध्यक्ष पवन भालेराव यांनी शहर आणि परिसरातील सर्व नागरिकांना आणि समाज बांधवांना या सर्व कार्यक्रमांमध्ये मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन केले आहे. नक्कीच, तर हा चार दिवसांचा महोत्सव बुलढाण्याच्या सांस्कृतिक आणि सामाजिक चळवळीत एक नवा उत्साह निर्माण करणारा ठरणार आहे.

# दिलीप एडतकर यांचा काँग्रेस सरचिटणीस पदाचा राजीनामा

जनसंचलन/बुलढाणा



महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे सरचिटणीस व धनगर समाजाचे नेते ऍड. दिलीप एडतकर यांनी त्यांच्या पदाचा राजीनामा दिला असून तशा अर्थाचा ई-मेल प्रदेश काँग्रेस अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ महाराष्ट्र प्रभारी रमेश चेन्निथला, वरिष्ठ नेत्या यशोमती ठाकूर व वरिष्ठ नेते डॉ. सुनील देशमुख यांना पाठविला आहे. राजीनामा पत्रात ऍड. एडतकर म्हणतात, आपण मला मी न मागता प्रदेश काँग्रेस सरचिटणीस पदाची जबाबदारी दिली होती. त्याबद्दल मी आपला शतशः आभारी आहे. माझ्या परीने मी ती इमाने इतबारे पार पाडली आहे. तथापि यापुढे प्रदेश काँग्रेस सरचिटणीस या नाममात्र पदाला चिकटून राहणे मला शक्य नाही. सबब प्रदेश सरचिटणीस पदाचा राजीनामा स्वीकारावा ही नम्र विनंती. ऍड. एडतकर हे धनगर समाजाचे मोठे नेते असल्याने हा राजीनामा अमरावती काँग्रेसला मोठा धक्का मानला जात आहे

# भगवान महावीर जन कल्याणक शोभायात्रेचे सम्यक समन्वय समितीच्या वतीने स्वागत

जनसंचलन/ बुलढाणा



३१ मार्च रोजी भगवान महावीर यांच्या जयंतीनिमित्त बुलढाणा शहरात जैन बांधवांकडून भगवान महावीर जन कल्याणक शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले होते. सामाजिक बांधिलकी म्हणुन सम्यक समन्वय समितीच्या सदस्यांनी शोभायात्रेचे स्वागत केले व जैन बांधवांना पुष्प देऊन त्यांना जयंतीच्या शुभेच्छा दिल्या.

या मंगल प्रसंगी सम्यक समन्वय समितीचे सुभेदार श्रीराम जाधव, पी.आर इंगळे, जे.पी.वाकोडे, मंगल मिसाळ, प्रेम इंगळे, नरेश बोरकर, अशोक दाभाडे, संजय कस्तुरे, सुरेश सरकाटे, विजय काळे, मिलिंद वानखडे, सुभाष साबळे, सुशील इंगळे, भैय्यासाहेब पाटील, अर्चनाताई जाधव, सुजाताताई हिवाळे, वैशालीताई जाधव, सुकेशनीताई खरात, विजय वाकोडे, दादाराव पगारे, सुधाकर बावसकर, अनिल डोंगारदिवे, सुनील जाधव इत्यादी उपस्थित होते.

# मासरूळ जिल्हा परिषद सर्कलमध्ये गरजू रुग्णांसाठी मोफत शस्त्रक्रिया मोहिमेचे आयोजन...!

## आतापर्यंत ३५०० हून अधिक शस्त्रक्रिया यशस्वी; मनोजभाऊ दांडगे यांचा पुढाकार...!

जनसंचलन/बुलढाणा

आर्थिक परिस्थितीअभावी शस्त्रक्रिया रखडलेल्या मासरूळ जिल्हा परिषद सर्कल मधील रुग्णांसाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष मनोज ज्ञानदेवराव दांडगे यांनी मदतीचा हात पुढे केला आहे. या उपक्रमांतर्गत गरजू रुग्णांवर जळगाव खान्देश येथे मोफत शस्त्रक्रिया करण्यात येणार असून, यासाठी सोमवार, दिनांक ६ एप्रिल २०२६ रोजी मोफत बस रवाना होणार आहे. मासरूळ परिसरातील अनेक कुटुंबांमध्ये गंभीर आजार असूनही पैशांच्या टंचाईमुळे शस्त्रक्रिया करणे शक्य होत नाही. ही अडचण लक्षात घेऊन मनोजभाऊ दांडगे (अध्यक्ष, चिखली विधानसभा मतदारसंघ राष्ट्रवादी काँग्रेस) यांच्या माध्यमातून ही मोफत आरोग्य सेवा राबवण्यात येत आहे. विशेष म्हणजे, या मोहिमेद्वारे आतापर्यंत ३५०० हून अधिक रुग्णांवर यशस्वी शस्त्रक्रिया करून त्यांना नवजीवन देण्यात आले आहे. मोफत प्रवास आणि उपचार: निवड झालेल्या रुग्णांना जळगाव खान्देश येथील रुग्णालयात नेण्यासाठी चिखलीतून मोफत बस सेवा उपलब्ध करून दिली जाणार आहे. शस्त्रक्रियेचा संपूर्ण खर्च, औषधोपचार आणि प्रवासाची व्यवस्था आयोजकांतर्फे करण्यात आली आहे. नाव नोंदणीचे आवाहन: ज्या रुग्णांना डॉक्टरांनी शस्त्रक्रियेचा सल्ला दिला आहे, अशा मासरूळ सर्कल मधील सर्व नागरिकांनी या सुविधेचा लाभ घ्यावा. ही गाडी सोमवारी (६ एप्रिल) रवाना होणार



असल्याने, इच्छुक रुग्णांनी तत्काळ संपर्क क्रमांकावर आपली नाव नोंदणी करणे आवश्यक आहे. अधिक माहितीसाठी आणि नोंदणीसाठी स्थानिक राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन मनोज दांडगे यांनी केले आहे.



# महाराष्ट्र राज्यातील डिजिटल मिडिया परिषदेच्या सर्व जिल्ह्यांनी सहभागी व्हावे - प्रदेशाध्यक्ष अनिल वाघमारे

जनसंचलन/बुलढाणा

अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे उदगीर जिल्हा लातूर येथे ४४ वे राष्ट्रीय अधिवेशन परिषदेचे मुख्य विश्वस्त श्री.एस.एम.देशमुख सर यांच्या अध्यक्षतेखाली होत आहे.या ४४ व्या राष्ट्रीय अधिवेशनात डिजिटल मिडिया परिषदेच्या महाराष्ट्र राज्यातील सर्व जिल्ह्यांनी सहभागी व्हावे असे आवाहन प्रदेशाध्यक्ष अनिल वाघमारे यांनी केले आहे. याबाबत अधिक वृत्त असे की, अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे राष्ट्रीय अधिवेशन मुख्य विश्वस्त श्री एस.एम. देशमुख सर यांच्या अध्यक्षतेखाली दर दोन वर्षांनी महाराष्ट्र राज्यातील विविध जिल्ह्यात होत असते. या वर्षीचे ४४ वे राष्ट्रीय अधिवेशन हे लातुर जिल्ह्यातील उदगीर या ठिकाणी दिनांक १८ आणि १९ एप्रिल २०२६ रोज होत आहे. या ४४ व्या राष्ट्रीय अधिवेशनाचे उद्घाटन लोकमत माध्यम समुहाचे मुख्य संपादक श्री.राजेंद्रबाबु दर्डा यांच्या हस्ते होणार आहे. महाराष्ट्र



राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे या अधिवेशनाचे मुख्य आकर्षण असणार आहेत. त्याच बरोबर उबाठाचे नेते खासदार संजय राऊत यांची थेट मुलाखत होणार आहे. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री आणि इतर मान्यवर मंत्री, खासदार,आमदार, सेलिब्रिटी त्याच बरोबर या राष्ट्रीय अधिवेशनाचे स्वागताध्यक्ष राज्याचे बांधकाम राज्यमंत्री तथा लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री ना.श्रीमंत.छत्रपती शिवेंद्रसिंहराजे भोसले,माजी मंत्री आ.संजय बनसोडे हे असणार आहेत. आपण आपल्या जिल्ह्यातील डिजिटल मिडीया परिषदेचे जिल्हाध्यक्ष या नात्याने सर्वांना या राष्ट्रीय अधिवेशनाची माहीती द्यावी. व अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त श्री.एस.एम सर यांच्या अध्यक्षतेखाली होत असलेल्या परिषदेच्या ४४ व्या राष्ट्रीय अधिवेशनात येत्या १८ आणि १९ एप्रिल रोजी उदगीर येथे सहभागी व्हावे. अशा सुचना देऊन महाराष्ट्र राज्यातील डिजिटल मिडिया परिषदेच्या सर्व जिल्ह्यांनी सहभागी होण्यासाठी जिल्हाध्यक्षांनी तयारी करावी असे आवाहन डिजिटल मिडिया परिषदेचे प्रदेशाध्यक्ष अनिल वाघमारे यांनी केले आहे.

आपल्या पाल्याच्या शिक्षणासाठी आजच बचत सुरु करा व त्याचे भविष्य सुरक्षित करा

बचत करा रु. ५०० प्रती माह पासून..



| अ.क्र. | गुंतवणुक कालावधी महिने | ५०० | १००० | १५०० | २००० | ३००० | ५००० |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | पाल्याच्या वयाच्या १८ वर्षानंतर मिळणारी रक्कम | | | | | |
| १ | १५६ | १०३४१८ | २०६८३६ | ३१०२५४ | ४१३६७२ | ६२०५०७ | १०३४१७९ |
| २ | १४४ | ९५५४४ | १९१०८८ | २८६६३३ | ३८२१७७ | ५७३२६५ | ९५५४४२ |
| ३ | १३२ | ८८२६९ | १७६५३८ | २६४८०६ | ३५३०७५ | ५२९६१३ | ८८२६८८ |
| ४ | १२० | ८१५४४ | १६३०८७ | २४४६३१ | ३२६१७५ | ४८९२६२ | ८१५४३६ |
| ५ | १०८ | ७५३३६ | १५०६७१ | २२६००७ | ३०१३४२ | ४५२०१३ | ७५३३५५ |
| ६ | ९६ | ६५५९६ | १३९१९३ | २०८७८९ | २७८३८६ | ४१७५७९ | ६९५९६५ |

ठेवींवरील आकर्षक व्याजदर

| अ.क्र. | मुदती ठेवीचे विवरण | | लागू व्याजदर | पतसंस्था व इतर संस्था |
|---|---|---|---|---|
| १ | १५ दिवस ते ९० दिवस | | ६.००% | ६.००% |
| २ | ९१ दिवस ते १८० दिवस (वैयक्तीक ठेवी करिता) | | ६.५०% | ५.००% |
| ३ | १८१ दिवस ते १३ महिने | | ६.००% | ६.००% |
| ४ | १४ महिन्याच्या वर २४ महिन्यापर्यंत (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ५ | आवर्त ठेव योजना २४ महिन्याकरिता रू. १५ लाखाचे वर (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ६ | मासिक ठेव | | ७.००% | – |
| ७ | बचत ठेव | अ) रू. ३ लाखांपर्यंत | ३.००% | - |
| | | ब) रू. ३ लाखांचे वर | ४.५०% | – |

ज्येष्ठ नागरिक, सैनिक, सैनिकांच्या विधवा पत्नी, दिव्यांग यांना ठेवींच्या व्याजदरावर १/२ टक्का जास्त व्याजदर लागू राहील.

5 लाख पर्यंतच्या ठेवींना DICGC चे संरक्षण कवच प्राप्त आहे



पुन्हा एकदा...

सुकन्या लक्षाधीश ठेव योजना

गुंतवणूकीचा कालावधी मुलीच्या वयाच्या १० वर्षापर्यंत

ग्राहकांच्या आग्रहाला मान देऊन बँक पुन्हा सुरू करीत आहे

सुकन्या लक्षाधीश ठेव योजना

जन्मापासून ते वय वर्ष १० पर्यंतच्या मुलींच्या भावी आयुष्यासाठी एकदाच या योजनेत गुंतवणूक करा व मुलीच्या २१ व्या वर्षी लक्षाधीश व्हा.

| वय | गुंतवणूक रक्कम | मिळणारी रक्कम |
|---|---|---|
| जन्माच्या वेळी | १७००० | १०३६०९ |
| १ वर्ष | १८००० | १००६५७ |
| २ वर्ष | १९५०० | १०००५२ |
| ३ वर्ष | २१५०० | १०१२१७ |
| ४ वर्ष | २३५०० | १०१५०९ |
| ५ वर्ष | २५५०० | १०१०६४ |
| ६ वर्ष | २७५०० | १००००३ |
| ७ वर्ष | ३०००० | १०००९७ |
| ८ वर्ष | ३३००० | १०१०२७ |
| ९ वर्ष | ३६००० | १०११२२ |
| १० वर्ष | ३९००० | १००५१५ |

आजच जवळच्या शाखेशी संपर्क करा

दि चिखली अर्बन को-ऑप. बँक लि. चिखली

मुख्यालय : डॉ. शामाप्रसाद मुखर्जी मार्ग, छत्रपती शिवाजी महाराज चौक, चिखली, जि. बुलडाणा

फोन : ०७२६४-२४२०३९, २४२९७९, २४२०३८ टोल फ्रि नंबर : १८००-३१३-२३२४

# कृषी पुरस्कारांसाठी ऑनलाईन अर्जास १५ एप्रिलपर्यंत मुदतवाढ

जनसंचलन/बुलडाणा

: महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागामार्फत सन २०२५ साठी विविध कृषी पुरस्कारांसाठी ऑनलाईन अर्ज करण्यास १५ एप्रिल २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. यापूर्वी अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख ३१ मार्च २०२६ होती. राज्यातील शेती व पूरक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शेतकरी, महिला, व्यक्ती व संस्थांचा सन्मान करण्यासाठी दरवर्षी विविध पुरस्कार दिले जातात. यामध्ये डॉ. पंजाबराव देशमुख कृषिरत्न, वसंतराव नाईक कृषिभूषण, जिजामाता कृषिभूषण, वसंतराव नाईक शेतीमित्र, वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी, उद्यानपंडित, कृषिभूषण (सेंद्रिय शेती), युवा शेतकरी तसेच पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील कृषी सेवारत्न आदी पुरस्कारांचा समावेश आहे.

यंदा प्रथमच कृषी विभागाने अर्ज प्रक्रिया पूर्णपणे ऑनलाईन स्वरूपात सुरू केली आहे. यासाठी स्वतंत्र संगणकीय प्रणाली विकसित करण्यात आली असून कृषी विभागाच्या अधिकृत संकेतस्थळावर ‌‍‍ कृषी पुरस्कार या टॅबमध्ये अर्ज सादर करता येत आहेत. या प्रणालीमुळे अर्ज सादरीकरण, तपासणी, मूल्यांकन व अहवाल निर्मिती प्रक्रिया अधिक सुलभ, पारदर्शक व वेळबद्ध होणार आहे. दरम्यान, ऑनलाईन प्रणालीचे हे पहिलेच वर्ष असल्याने तसेच जिल्हा पोलीस अधीक्षकांकडील चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र मिळविण्यास वेळ लागत असल्यामुळे अनेक अर्ज प्रलंबित राहिले होते. त्यामुळे शेतकरी व क्षेत्रीय स्तरावरून मुदतवाढीची मागणी करण्यात आली होती. या पार्श्वभूमीवर कृषी विभागाने अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत १५ एप्रिल २०२६ पर्यंत वाढविली आहे. तरी इच्छुक शेतकरी, व्यक्ती व संस्थांनी दिलेल्या मुदतीत ऑनलाईन अर्ज सादर करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====

संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८